वाचले :- १. महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२,
२. नायब तहसिलदार - गट ब (सेवा प्रवेश) नियम १९९८
३. शासनाचे महसूल व वन विभागाकडील परिपत्रक क्र. एसआरव्ही १०२००० / प्र.क्र.१२७ /ई ९, दिनांक ९.१०.२०००
४. शासनाचे महसूल व वन विभागाकडील परिपत्रक क्र. एसआरव्ही - २०१४ / प्र.क्र. ०२५ / ई ७, दिनांक ३१.१.२०१४
५. या कार्यालयाकडील पत्र क्र. मह / आस्था १ ई / कावि / ११४९ / २०१७ दिनांक १३.९.२०१७ व पत्र क्र. मह / आस्था १ ई / कावि / १२२४ / २०१७ दिनांक २९.९.२०१७
६. जिल्हाधिकारी सोलापूर यांचेकडील क्र. २०१७ / आस्था ३ / आर आर / २१४७ , दिनांक २९.९.२०१७
७. जिल्हाधिकारी सातारा यांचेकडील क्र. मह १ / आस्था १ / कावि / ९०४ / २०१७, दिनांक १७.११.२०१७
८. जिल्हाधिकारी कोल्हापूर यांचेकडील क्र. मह आस्था कार्या१ / आर आर / ७७० / २०१७, दिनांक १७.११.२०१७
९. जिल्हाधिकारी सांगली यांचेकडील क्र. मह कार्या १ / आस्था ३ / आर आर / ५६१ / २०१७, दिनांक १७.११.२०१७
१०. जिल्हाधिकारी पुणे यांचेकडील क्र. पमट/कावि/१२६२/२०१७, दिनांक २.१२.२०१७

---

विभागीय आयुक्त कार्यालय पुणे,
विधान भवन, महसूल शाखा,
क्र.मह/आस्था१ई/कावि/१५२७/२०१७,
पुणे दिनांक १३.१२.२०१७

विषय :- पुणे विभागातील मंडल अधिकारी संवर्गाची दिनांक १.१.१९९७ ते १.१.२०१७ या कालावधीची संयुक्त सेवा ज्येष्ठता यादी

**ज्ञापन**

शासनाचे महसूल व वन विभागाकडील परिपत्रक क्र. एसआरव्ही - २०१४ / प्र.क्र. ०२५ / ई ७, दिनांक ३१.१.२०१४ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली १९८२, महसूल व वन विभागाकडील परिपत्रक क्र. एसआरव्ही १०२००० / प्र.क्र.१२७ /ई ९, दिनांक ९.१०.२००० मधील तरतुदी विचारात घेऊन विभागीय स्तरावरील मंडल अधिकारी संवर्गाची विभागीय स्तरावरील संयुक्त ज्येष्ठता यादी तयार करण्याकामी सूचीत करण्यात आलेले आहे.

मंडल अधिकारी (सेवा प्रवेश) नियम १९९६, प्रमाणे तलाठी संवर्गातून मंडल अधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यासाठीचे नियम विचारात घेऊन तलाठी संवर्गातील कर्मचारी यांची विभागीय दुय्यम सेवा परीक्षा आणि महसूल अर्हता परीक्षा विहीत मुदतीत / संधीत उत्तीर्ण झाले असल्यास अथवा परीक्षा उत्तीर्ण होण्यास सूट मिळाली आहे का याबाबी विचारात घेऊन त्या संवर्गाच्या सेवा ज्येष्ठता यादया अदययावत करण्याबाबत संबंधित

जिल्हाधिकारी यांना या कार्यालयाकडील दिनांक १३.९.२०१७, २९.९.२०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.

उपरोक्त सूचनांनुसार मंडल अधिकारी संवर्गाच्या तयार करण्यात आलेल्या सेवा ज्येष्ठता यादया संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडून या कार्यालयामध्ये प्राप्त करुन घेण्यात आलेल्या आहेत. सर्व जिल्हयांच्या यादया विचारात घेऊन शासनाचे महसूल व वन विभागाकडील परिपत्रक क्र. एसआरव्ही - १०२००० / प्र.क्र. १२७ / ई ९, दिनांक ९.१०.२००० सोबतच्या विहीत नमुन्यात पुणे विभागातील मंडल अधिका-यांची प्रारुप संयुक्त ज्येष्ठता यादी प्राथमिक स्वरुपात या सोबत जोडून प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदरची प्रारुप संयुक्त ज्येष्ठता यादी जिल्हाधिकारी यांनी संबधितांचे निदर्शनास आणून दयावी. प्रारुप ज्येष्ठता यादीबाबत हरकती असल्यास त्या संबंधित जिल्हाधिकारी यांचेकडे संबंधित कर्मचा-यांनी पुराव्याचे कागदपत्रांसह दिनांक २१.१२.२०१७ पर्यंत सादर कराव्यात. जिल्हाधिकारी यांनी प्राप्त हरकती सेवा अभिलेख अथवा पुराव्याचे कागदपत्र तपासून त्या मान्य कराव्यात अगर कसे याबाबत त्यांचे स्पष्ट अभिप्रायासह त्यांचा अहवाल दिनांक ३०.१२.२०१७ पर्यंत या कार्यालयास सादर कराव्यात.

स्थळ प्रतीवर मा. विभागीय आयुक्त,
पुणे विभाग पुणे यांची स्वाक्षरी असे.

सही/-
(प्रताप जाधव)
**उप आयुक्त, (महसूल)**
**पुणे विभाग पुणे**

**प्रति,**

जिल्हाधिकारी पुणे / सातारा / सांगली / सोलापूर / कोल्हापूर

| अ.क्र. | नांव | जिल्हा | प्रवर्ग (नियुक्तीनंतर प्रवर्ग बदलेला असल्यास त्यांचा दिनांक) | जन्मदिनांक | नियुक्ती दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक पात्रता | महसूल अर्हता परीक्षा उत्तीर्ण वर्ष अगर परीक्षा सूट वर्ष | उत्तीर्ण / सूट | महसूल अर्हता परिक्षेनुसार सेवाजेष्ठता दिनांक | | | मंडळ अधिकारी संवर्गात काम करीत असलेली तारीख | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ |
| १७०७ | श्री व्ही. एच. गायकवाड | सोलापूर | खुला | 1-Jun-1960 | 09/07/2004<br>11/06/2008 | 31-May-2018 | एस.एस.सी. | सुट 10/2008 दि. 08/11/2008 | सुट | २ | ४ | २०१७ | | | 2-Apr-2017 | कार्यरत |
| १७०८ | श्री एच. आर. नवले | सोलापूर | खुला | 1-Jun-1959 | 20-Jan-2004 | 30-May-2017 | एच. एस. सी. | सुट 10/2008 दि. 08/11/2008 | सुट | २ | ४ | २०१७ | | | 2-Apr-2017 | सेवानिवृत्त |
| १७०९ | श्री सी. आर. जानराव | सोलापूर | अ.जात | 3-May-1963 | 13/11/1993<br>26/12/2008 | 31-May-2021 | बी.ए. | सुट 10/2009 दि. 02/01/2010 | सुट | २ | ४ | २०१७ | | | 2-Apr-2017 | कार्यरत |

(प्रताप जाधव)
उप आयुक्त, (महसूल)
पुणे विभाग पुणे

पुणे दिनांक १३.१२.२०१७
स्वाक्षरीत मा. विभागीय आयुक्त,
पुणे विभाग पुणे यांनी स्वाक्षरी आहे.